सरस्वती एज्युकेशन सोसायटी, दादर(प.),मुंबई संचलित डॉ. एन. वाय. तासगांवकर इन्स्टीट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस, मौ.डिकसळ, भिवपूरी रोड स्टेशन, ता. कर्जत, जि.रायगड या वैद्यकीय महाविद्यालयाला सन २०२१-२२ करिता प्रथम बॅच सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

---

## महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्रमांक एमईडी-२०१५/प्र.क्र.१९/१५/शिक्षण-१,
९वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई- ४०० ००१.
दिनांक :- २५.०३.२०२२.

वाचा :-
१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र. मआविवि/पीबी/युजी/१३२४/२०१४, दि. २६.१२.२०१४
२) शासनाचे समक्रमांकीत आवश्यकता प्रमाणपत्र क्र.एमईडी-२०१५/प्र.क्र.१९/१५/शिक्षण-१, दि.१६.०६.२०१५
३) समक्रमांकित दि. २८.०८.२०२० रोजीचे आवश्यकता प्रमाणपत्र.
४) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र. मआविवि /पीबी/युजी/Consent/P-१/४१२/२०२०, दि.१४.०९.२०२०.
५) राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांचे क्र. NMC/UG/ २०२०/ ००००३६/०४३७८०, दि. ६.१२.२०२१ चे पत्र.

**प्रस्तावना:-**

सरस्वती एज्युकेशन सोसायटी, दादर(प.),मुंबई संचलित डॉ. एन. वाय. तासगांवकर इन्स्टीट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस, मौ.डिकसळ, भिवपूरी रोड स्टेशन, ता. कर्जत, जि.रायगड या वैद्यकीय महाविद्यालयास दिनांक २८.०८.२०२० रोजी राज्य शासनामार्फत आवश्यकता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले होते. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांनी सदर महाविद्यालयास दिनांक ०६.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये मान्यता (LoP) प्रदान केली आहे. त्यानुसार संस्थेने प्रथम वर्षासाठी परवानगी देण्याची विनंती केली आहे. त्याअनुषंगाने सदर संस्थेस एम.बी.बी.एस. वैद्यकीय अभ्यासक्रमास १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह प्रथम वर्षाकरिता शैक्षणिक वर्ष सन २०२१-२२ साठी परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

सरस्वती एज्युकेशन सोसायटी, दादर(प.),मुंबई संचलित डॉ. एन. वाय. तासगांवकर इन्स्टीट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस, मौ.डिकसळ, भिवपूरी रोड स्टेशन, ता. कर्जत, जि.रायगड या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने क्रमांक (५) येथील पत्रान्वये १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसाठी मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने शैक्षणिक वर्ष सन २०२१-२२ साठी एम.बी.बी.एस. अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाकरिता सदर

वैद्यकीय महाविद्यालयास १०० विद्यार्थी प्रवेशित करण्यासाठी पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे.

**<u>अटी व शर्ती:-</u>**

अ. अध्यक्ष, सरस्वती एज्युकेशन सोसायटी, दादर(प.),मुंबई संचलित डॉ. एन. वाय. तासगांवकर इन्स्टीट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस, मौ.डिकसळ, भिवपूरी रोड स्टेशन, ता. कर्जत, जि.रायगड या वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थी प्रवेश क्षमता केंद्र शासनाने निर्धारित केल्यानुसार १०० एवढी राहील.

आ. राज्य शासन/ केंद्र शासन/ मा. सर्वोच्च न्यायालय अथवा मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दत अवलंबिण्यात यावी.

इ. शासकीय नियम/निर्णय/अधिनियम, मा. सर्वोच्च व मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

ई. केंद्र शासन, भारतीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली व राज्य शासन यांनी वैद्यकीय अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

उ. महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयुशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९८८ चा ६) मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

ऊ. सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी अनुदानाची मागणी शासनाकडे करणार नाही.

ए. शासकीय वैद्यकीय किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत किंवा नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

ऐ. संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेश करण्यात येऊ नये.

ओ. केंद्र शासनाने दिलेली परवानगी ही सन २०२१-२२ वर्षाकरिता प्रवेशित होणारे विद्यार्थी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षामध्ये दाखल होईपर्यंत असून संस्थेने त्यानुसार पुढील वर्षाचे विद्यार्थी प्रवेश करण्यापूर्वी केंद्र शासनाच्या तसेच त्या आधारे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या परवानगीचे नुतनीकरण करुन घेणे बंधनकारक राहील.

औ. संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्याकडून मंजूर करुन घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काची निश्चिती शुल्क नियामक प्राधिकरणाकडून करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

२. सदर आदेश संदर्भ क्र.(५) येथील राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या दिनांक ०६.१२.२०२१ च्या पत्रान्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम,

१९९८ मधील कलम ६४ नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

तसेच सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२२०३२५१७१८२४८७१३ असा आहे.

हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHRINIVAS PUNDLIKRAO KOTWAL

Digitally signed by SHRINIVAS PUNDLIKRAO KOTWAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d32b061d22e577cf43207f6a86cadc4ce1798644845edd3b3fb5ef54c3051c62, pseudonym=FBB5CB78D48FD59FDB880E6E036B604B5888852F, serialNumber=30EC04F686F0E87515C68A42BC5DF9353C8AF939EF1A35539184495DA3E943C6, cn=SHRINIVAS PUNDLIKRAO KOTWAL
Date: 2022.03.25 17:55:36 +05'30'

(डॉ. श्री.पुं.कोतवाल)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राज भवन, मलबार हिल, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
६) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८) संचालक, आयुर्वेद संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
१०) अधिष्ठाता, सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये.
११) सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ८ व ९वा मजला, न्यु एक्सेलसिअर बिल्डींग, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१.
१२) सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, ३रा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पू), मुंबई-४०००५१.
१३) अध्यक्ष, असोसिएशन ऑफ मॅनेजमेंटस ऑफ एन एडेड प्रायव्हेट ॲण्ड डेंटल, कॉलेजेस, महाराष्ट्र, मॅझनिन फ्लोअर, श्री. जी. हाऊस, ७५, मिंटरोड, फोर्ट, मुंबई.
१४) अध्यक्ष, सरस्वती एज्युकेशन सोसायटी, दादर(प.),मुंबई
१५) अवर सचिव (शिक्षण २), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) निवडनस्ती (शिक्षण-१).